महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०८ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

महत्वाचे



## राहुल गांधी विरोधातील खटल्याची 20 डिसेंबर रोजी सुनावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी)** भिवंडी लोकसभा (२०१४) च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रारंभी भिवंडी तालुक्यातील सोनाळे गांव येथील मैदानात ६ मार्च २०१४ रोजी काँग्रेस पक्षाकडून आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी यांनी आरएसएसच्या लोकांनी गांधीजींची हत्या केली,असे कथित विधान केले होते.या विधानाबद्दल भिवंडीतील आरएसएस कार्यकर्ते राजेश कुंटे यांनी राहुल गांधी विरोधात फौजदारी मानहानी खटला दाखल केला होता.या खटल्याची सुनावणी आता २० डिसेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली आहे.सरकारी वकिलांच्या प्रमुख साक्षीदाराच्या अनुपस्थितीमुळे न्यायालयाने हा निर्णय घेतल्याची माहिती अँड नारायण अय्यर यांनी दिली. शनिवारी या खटल्याची सुनावणी भिवंडी न्यायालयात होती परंतु साक्षीदार पोलीस अधिकारी अशोक सायकर वैयक्तिक कारणांमुळे हजर राहू न शकल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.आता २० डिसेंबर रोजी अशोक सायकर यांची साक्ष नोंदवली जाण्याची शक्यता खा. राहुल गांधी यांचे वकील अँड नारायण अय्यर यांनी दिली आहे.सायकर सध्या सोलापूरमधील बार्शी येथे पोलीस उपअधीक्षक आहेत. या खटल्यात सायकर यांची साक्ष महत्त्वाची मानली जात आहे,कारण २०१४ मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २०२ अंतर्गत मानहानीच्या खटल्याचा प्रारंभिक तपास केला होता.सायकर यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे,न्यायालयाने राहुल गांधींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ५०० अंतर्गत समन्स जारी केले होते.



## श्री स्वामी समर्थ केंद्रात दत्तजयंती सोहळा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त चा जयघोष करीत शहर परिसरात श्री दत्त जयंती उत्सव भक्तिमय वातारणात संपन्न झाला. कल्याण पश्चिम तानाजी नगर येथील श्री स्वामी समर्थ चौकातील श्री स्वामी समर्थ केंद्रात गेल्या आठ दिवसांपासून श्री दत्त जयंतनिमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह आणि आणि स्वामी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्याची सांगता श्री दत्त जन्मोत्सव आणि सामुहिक आरतीने करण्यात आली. यावेळी श्री स्वामी समर्थ च्या जयघोषाने संपूर्ण परिसर स्वामीमय झाला होता. कल्याण पश्चिम तानाजी नगर येथील श्री स्वामी समर्थ चौकातील श्री स्वामी समर्थ केंद्रात आयोजित केलेल्या श्री दत्त जयंती उत्सवात आठ दिवसीय अखंड सप्ताहात मंडळ पूजन अग्नी स्थापना,श्री गणेश याग, मनोबोध याग, गीताई याग, स्वामी याग, चंडी याग रुद्र याग, मल्हार याग, सत्य दत्त पादुका पूजन नंतर श्री दत्त जयंती उत्सवाची सांगता कऱण्यात येणार असल्याची माहिती केंद्राचे सेवेकरी महेश वाघ आणि सुनिता आढे यांनी दिली. हा उत्सव साजरा करण्यासाठी केंद्रातील रोहिदास गायकर, भारती गायकर, मधुकर कुंभार, रामकृष्ण मराठे, ज्ञानेश्वर पाटील, स्नेहा चव्हाण, किशोर रडे, आर बी मोरे, कैलास काकड, संदीप ठाकूर, संजय ठाकूर यांच्या सह अन्य सेवेकरीनी मोठया संख्येने सहभागी होवून हा सोहळा साजरा केला.

# आजपासून विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि.7/वार्ताहर**



**नागपूर** : राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपूर इथं सुरूवात होत आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला. अत्यावश्यक सुविधा, निवारा, पार्किंग, सुरक्षा व्यवस्था वायफाय, टपाल तसंच आहार याबाबत प्रशासनानं उत्तम पद्धतीनं नियोजन केलं असल्याचं त्यांनी नागपूर इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधे विरोधी पक्षनेतेपदाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचं वार्ताहरांच्या प्रश्नाला उत्तर देताना शिंदे यांनी सांगितलं. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे देखील यावेळी उपस्थित होत्या.

**अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी महाविकास आघाडीनं बहिष्कार टाकला. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अनिल देशमुख, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.**

### विरोधी महाविकास आघाडीचा चहापानावर बहिष्कार

सरकारनं विरोधी पक्षनेतेपद रिक्त ठेवून चहापानाला बोलावणं, तसंच शेतकरी विरोधक असलेल्या सरकारच्या चहापानाला जाणं योग्य वाटत नसल्यानं बहिष्काराचा निर्णय घेतल्याचं वडेट्टीवार यांनी सांगितलं. कापसावरचा आयातकर ११ टक्क्यावरून शून्य टक्के केल्यानं राज्यातला कापूस उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे, सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं आहे, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, देशातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपैकी ३८ टक्क्यांपेक्षा जास्त शेतकरी राज्यातले आहेत, अशी टीका त्यांनी केली. राज्याची तिजोरी रिकामी झाली आहे, ९ लाख कोटींपेक्षा जास्त कर्ज झालं आहे, निधी वाटपात भेदभाव असून लहान शहरांकडे दुर्लक्ष केलं जात आहे, कमिशनसाठी निधी वाटप होतो आहे, असे आरोप त्यांनी केले.

तर राज्यात मुली असुरक्षीत आहेत, कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे, महार वतनाची जमीन नियमबाह्य पद्धतीनं विकत घेणाऱ्यांविरोधात कारवाई होत नाही, अशी टीका भास्कर जाधव यांनी केली.

# कल्याण डोंबिवलीचा पाणी प्रश्न कायम स्वरुपी निकाली काढणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### काळू धरणाच्या निर्मितीला चालना देण्यासाठी मुख्यमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे स्वतंत्र धरण असावे या करिता काळू धरण उभारण्यासाठी मुख्यमंत्री असताना चालना दिली व त्यासाठी एमएमआरडीच्या माध्यमातून धरणग्रस्तांच्या पुनर्वसना साठी तात्काळ पाचशे कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. या प्रस्तावित धरणाच्या कामाला चालना देण्यासाठी विद्यमान मुख्यमंत्र्यांना सांगितले आहे. तसेच पालिका क्षेत्रातील नागरीकांची पाणी टंचाई समस्या कायमची सुटण्यासाठी पाण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. त्यामुळे येत्या काहीच वर्षात कल्याण डोंबिवलीकरासाठी स्वतंत्र धरणाचा प्रश्न निकाली निघणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डोंबिवलीत एका कार्यक्रमात केले .

डोंबिवलीतील संत सावळाराम क्रीडा संकुलात देशातील पहिले व्हर्टीकल स्पोर्ट संकल्पनेतून उभारण्यात येणाऱ्या बहुमजली इन डोअर आऊट डोअर इमारतीचे आणि सावत्रिबाई फुले नाट्य गृहाचे नुतनीकरणाचे काम याचे भूमीपूजन तसेच प्रेरणा वॉर मेमोरियल या स्मारकाचे लोकार्पण उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उद्योग मंत्री उदय सामंत, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, सुलभा गायकवाड, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हा प्रमुख राजेश कदम, पद्मश्री गजानन माने आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

या प्रसंगी शिंदे यांनी सांगितले की, तत्कालीन महाविकास आघाडी सरकार विकास प्रकल्प तसेच मेट्रोच्या कामांना स्थगिती देत अडथळे आणले होते मात्रआमच्या महायुतीचे सरकार येताच हे सर्वच अडथळे दूर करीत विकासाला गती दिली. विकास कामाकरीता कधीही निधी कमी पडू दिला नाही. विकास कामाला मी निधी देताना कधीच पाहिले नाही. सारंच सभा मध्ये महिला वर्ग मोठ्या प्रमाणात असतात या लाडक्या बहिणीसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली कोणाचाही माय का लाल आला तरी लाडकी बहिण योजना कधीही बंद पडू देणार नाही याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केली. इमारती व रस्ते आदी कामाबरोबर शहराची सांस्कृतिक भूक भागली पाहिजेत. पाण्यासाठी कुठेही पैसे कमी पडणार नाही असा उल्लेख आवर्जून केला.

**विकास कामांचा पाठपुरावा आणि त्यासाठी निधी मंजूर करण्यात खासदार शिंदे यांचे कौतूक करताना खासदार शिंदे यांच्याकडे विकासाचे व्हीजन आहे. ते रिझन देत नाहीत. त्यामुळे ऑन दी स्पॉट डिसिजन आहे. ही कामाची पद्धत चांगली आहे. २०१४ सालापूर्वी कल्याण मतदार संघातील विकास कामे आणि त्यानंतर झालेला विकास यात जमीन आस्मानचा फरक आहे. विकास काम करताना अनेकांनी अडथळे निर्माण केले, टिका केली. खड्डे खोदण्याचा प्रयत्न केले. तेच खड्डयात गेले अशी टिका खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी केली. कार्यक्रमाला येताना डोंबिवलीतील एका आजोबांचा फोन आला. त्यांनी कचरा समस्या सांगितली. लगेच आयुक्तांना फोन करुन ही बाब सांगितली. या आधीचे खासदार रेल्वे आणि टेलिफोन पुरते मर्यादीत होते. आपण मात्र सगळया समस्या सोडविण्यासाठई तत्पर असल्याचे खासदार शिंदे यांनी स्पष्ट केले.**



# बदलापूरमध्ये रेल्वेचा भोंगळ कारभार !

### बांधलेल्या जिन्याच्या जागेवर उद्वाहन?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : बदलापूर रेल्वेस्थानकाच्या अद्ययावत कामांमध्ये सुरू असलेल्या गोंधळामुळे पुन्हा एकदा प्रशासनाच्या नियोजनक्षमता आणि आर्थिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. होम प्लॅटफॉर्मच्या कामादरम्यान एक ते दीड वर्षापूर्वी प्रवाशांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेला नवा जिना आता जमीनदोस्त करण्यात आला आहे. त्याच ठिकाणी उद्वाहक बसवण्याचे काम सुरू आहे. नव्याने उभारलेल्या जिन्यासाठी खर्च झालेली रक्कम वाया गेल्याने हा पैशांचा चुराडा की नियोजनाचा बोजवारा, अशी चर्चा स्थानिक प्रवाशांमध्ये सुरू आहे. फलाट क्रमांक १ वरील जुन्या पुलाच्या तोडीपासून ते नवीन पुलाच्या उभारणीपर्यंतच्या प्रक्रियेत सतत बदलणारी योजना आणि वारंवार होणारी कामे यामुळे बदलापूर रेल्वे स्टेशनच्या व्यवस्थापनावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. एमआरव्हीसी विभागानुसार, हा जिना तात्पुरता असल्याचे आधीच सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे.




# उड्डाणे रद्द झाल्याचा फटका

### इंडिगोकडून आतापर्यंत 610 कोटींचा रिफंड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

इंडिगो एअरलाइन्समध्ये तांत्रिक अडचण आणि स्टाफच्या कमतरतेमुळे गेल्या आठवड्याभरापासून विमान उड्डाणं रद्द केली जात आहेत. विमानांना उशीर होत असल्यानं आणि अचानक उड्डाणं रद्द झाल्यानं प्रवाशांमधून संताप व्यक्त केला जातोय. दरम्यान, आता नागरी उड्यन मंत्रालयानं मोठे अपडेट दिले आहेत. आतापर्यंत विमान उड्डाणं रद्द झाल्यानं फटका बसलेल्या प्रवाशांना भरपाई पोटी जवळपास ६१० कोटी रुपये रिफंड देण्यात आले आहेत. केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू यांनी शेअरधारकांसोबत बैठक घेतल्यानंतर रिफंडबाबत आदेश देण्यात आले.

इंडिगोच्या उड्डाणांमध्ये अडथळा आल्यानं प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला. अशा प्रवाशांना इंडिगोनं आतापर्यंत ६१० कोटी रुपये रिफंड म्हणून दिले आहेत. यासोबतच एअरलाइन्सने शनिवारपर्यंत देशभरात ३ हजार बॅग्ज पोहोचवल्या आहेत.

गेल्या आठवड्यात इंडिगोच्या बूकिंग आणि चेक इन सिस्टिममध्ये अचानक तांत्रिक अडचण निर्माण झाली. यामुळे देशभरात शेकडो उड्डाणं रद्द करावी लागली तर अनेक विमानांना उशीर झाला. परिणामी हजारो प्रवासी विमानतळावरच अडकले. अनेकांच्या बॅग्ज हरवल्या. या घटनेनंतर सोशल मीडियावरून प्रवाशांनी संताप व्यक्त केलाय.

**इंडिगोने दिलेल्या माहितीनुसार ७ डिसेंबरला १३८ पैकी १३७ विमानतळांवर विमानसेवा सुरू झाली आहे. दिवसभरात १६५० पेक्षा जास्त विमानांचं उड्डाण झालं. तर शनिवारी १५०० पेक्षा जास्त विमानांचं उड्डाण झालं होतं. ऑन टाइम परफॉर्मन्स ७५ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. शनिवारी हे प्रमाण ३० टक्के होतं. १० डिसेंबरपर्यंत सर्व सेवा सुरळीत सुरू होईल**

# संकष्टी चतुर्थी निमित्त टिटवाळ्याच्या सिद्धिविनायक गणपती मंदिरात भाविकांची गर्दी


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा:- संकष्टी चतुर्थी निमित्त टिटवाळा येथील महागणपती मदिरात रवीवारी कमालीची गर्दी दिसून आली. पहाटे ४ वाजता दुग्धाभिषेक व आरती नंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. चतुर्थी व सुट्टीचा रवीवार आल्याने टिटवाळा विघ्नहर्त्याच्या दर्शनासाठी भाविकांची कमालीची गर्दी दिसून आली. परंतु रविवारी सुट्टीच्या दिवशी आलेल्या या संकष्टी चतुर्थीला अशा प्रकारी इतकी मोठ्या प्रमाणात गर्दी वर्षभरातील इतर चतुर्थीला कधीच दिसून आली नसल्याच्या प्रतिक्रीया सतत देवाच्या दर्शनासाठी येणारे गणेश भक्त दिलीप देवकर व वामन आगिवले, मुरबाड यांनी आमच्या प्रतिनिधीशी' बोलतांना व्यक्त केल्या.**



मंदिर विश्वस्ता्नी शनिवारी पासूनच चतुर्थी निमित्त पुजेची तयारी सुरू केली होती. पहाटे चार वाजता देवाला अभिषेक घातल्यावर आरती नंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. गणपती बाप्पा मोरया... मंगल मूर्ती मोरया.. उंदीर मामा की जय.. या घोषणांनी मंदिर, मंदिर परिसर व सभामंडप दणाणून गेले होते. पहाटे पासूनच मंदिर सभामंडपातील दर्शन बारीत भाविकांनी गर्दी केली होती. तसेच सकाळी सहा वाजल्यापासून मंदिरात गर्दीच्या प्रमाणात वाढ होत गेली ती संध्याकाळी अजूनच वाढत गेल. परंतू नेहमी प्रमाणे संकष्टी चतुर्थीला असणारी गर्दी व आजच्या गर्दीत फरक दिसून आला. सुरू असलेला मार्गशीर्ष मास व सुट्टीचा रवीवार यामुळे बाप्पाच्या दर्शनासाठी भाविकांची टिटवाळा गणपती मंदिरात मांदियाळीच अवतरली असल्याचे चित्र दिसून आले. यामुळे स्थानिक पोलीस यंत्रणेला चोख बंदोबस्त देऊन मुख्य रस्त्यावरील वाहतूक देखील वळती करावी लागली. कारण टिटवाळा रेल्वे स्थानक ते मंदिर व मंदिर ते गोवेली रोडवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यावरून असं वाटतं होतं की आज संकष्टी चतुर्थी आहे की अंगारकी चतुर्थी. बाप्पाच्या दर्शनासाठी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, बदलापूर, अंबरनाथ या उपनगरांसह मुंबई व ठाणे या शहरातील भाविक भक्तांनी हजेरी लावली होती.

टिटवाळा पोलीस ठाण्याच्या चोख बंदोबस्तात ठेवण्यात आला होता. मंदिर सुरक्षा रक्ष, अनिरुद्ध बापू साधक व काही सामाजिक संस्थांचे साधक देखील याठिणी आपली कर्तव्य बजावतांना दिसत होती. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची अग्निशमन दलाची व आरोग्य खात्याची यंत्रणा देखील मंदिर प्रांगणात सज्ज होती. रात्री उशीरा पर्यंत मंदिर भाविकांना दर्शनासाठीखुले ठेवण्यात येणार असल्याचे मंदिर विश्वस्त योगेश जोशी यांनी सांगितले.



## वाचक मनोगत

### दररोज फास्टफुड आरोग्यास घातक

आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात.

अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते.

विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही.

काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे.

फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# डोंबिवलीत रंगणार मराठी सेलिब्रिटी क्रिकेट लीग

## मराठी मनोरंजन विश्वातील 80 प्रतिष्ठित कलाकार क्रिकेटच्या मैदानात


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : 'डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार' यांच्या वतीने आयोजित आणि 'मराठी सेलिब्रेटी क्रिकेट लीग' अंतर्गत 'डोंबिवलीकर चषक' या भव्य सेलिब्रेटी क्रिकेट स्पर्धेला मराठी कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजप प्रदेशाध्यक्ष आणि आयोजक रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. कल्याण-डोंबिवली शहरात पहिल्यांदाच आयोजित होत असलेल्या या स्पर्धेमुळे शहराला वेगळंच ग्लॅमर प्राप्त झाल्याचे दिसून आले.**

### भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार' मार्फत क्रिकेट सामन्यांचे आयोजन

या स्पर्धेची सर्वात मोठी खासियत म्हणजे, मराठी मनोरंजन विश्वातील ८० प्रतिष्ठित कलाकार थेट मैदानात उतरून एकमेकांना मैत्रीपूर्ण आव्हान देत आहेत. या स्पर्धेतील संघांना दादासाहेब फाळके, व्ही. शांताराम, भालजी पेंढारकर, पु. ल. देशपांडे, दादा कोंडके, निळू फुले, रंजना आणि भक्ती इनामदार इ. कलाकारांची नावे देण्यात आली आहेत. मराठी मनोरंजनविश्वातील बहुमुल्य योगदानासाठी या मातब्बर कलाकारांना देण्यात येणारी ही एक आगळीवेगळी मानवंदना असल्याची प्रतिक्रिया मराठी कलाकारांनी व्यक्त केली आहे.

ज्या कलाकारांचा अभिनय आपण गेली अनेक वर्षे टीव्ही, चित्रपट किंवा नाटकांमध्ये अनुभवला, तेच कलाकार आता खेळाडूच्या भूमिकेत दिसत आहेत. हा केवळ सामना नाही, तर कला आणि क्रीडा क्षेत्राचा एक अद्भूत संगम आहे, जिथे कलाकारांची कलात्मक ऊर्जा आता खेळाच्या मैदानात झळकेल. त्यांची बॅटिंग, बॉलिंग आणि फिल्डिंग पाहणे रोमांचक ठरेल असा विश्वास यावेळी आयोजक रविंद्र चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान राज्याच्या राजकारणात तडाखेबंद खेळी करणाऱ्या भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनाही यावेळी क्रिकेट खेळण्याचा मोह आवरता आला नाही. रविंद्र चव्हाण यांनी यावेळी हातामध्ये बॅट घेत क्रिकेटच्या मैदानातही आपले कौशल्याची चुणूक दाखवली.





## सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयात जागतिक एड्स सप्ताहनिमित्त जनजागृती रॅली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

०४ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक एड्स सप्ताह निमित्ताने जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित सौ. कमलताई किसन कथोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा,या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व DLLE विभाग व रेड रिबन क्लब अंतर्गत जागतिक एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.




महाविद्यालय ते ग्रामीण रुग्णालय, म्हसा पर्यंत रॅली काढण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅडम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.कन्या हरड व प्रा. दिपक शेळके तसेच DLLE विभाग प्रमुख प्रा. विशाखा पवार आणि स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

## मुरबाड कला व क्रीडा महोत्सवाचे 26 डिसेंबर पासून आयोजन!


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुरबाड तालुक्यातील शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडागुणांना व्यासपीठ मिळावे, नागरिकांनाही आपल्या कला व क्रीडा गुणांचा विकास करता यावा म्हणून जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने 'मुरबाड कला व क्रीडा महोत्सव " 26 डिसेंबर 2025 पासून आयोजन करण्यात येणार आहेत. या महोत्सवामध्ये 10 हजार खेळाडू सहभागी होणार असल्याचे जनसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष पवार यांनी दिली.

जनसेवा प्रतिष्ठान, मुरबाड ही सामाजिक-सांस्कृतिक-क्रीडा बहुउद्देशीय क्षेत्रात काम करणारी संस्था आहे. माजी आमदार गोटिराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड तालुक्यांतील विद्यार्थी व युवकांचा विकास साधण्यासाठी जनसेवा प्रतिष्ठान आयोजित "मुरबाड कला क्रीडा महोत्सव" 2008 पासुन राबिण्याबाबत येत आहे. या वर्षीही 26, 27, 28 डिसेंबर 2025 पासून तीन दिवस या महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याने तालुक्यातील कला क्रीडा प्रेमीमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा महोत्सव मुरबाड तालक्यातील खेळाडूंसाठी मर्यादित असणार आहे. मुरबाड शहरात पहिल्या दिवशी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. कबड्डी, खो-खो, मॅरेथॉन, लावणी, होम मिनिस्टर, भावगीत, भजन स्पर्धा , लांब उडी, गोळा फेक इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत तालुक्यातील शाळेचे , महाविद्यालयाचे, संस्थेचे, मंडळाचे खेळाडू व कलाकारांनी सहभागी घ्यावा व महोत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे. तसेच आपली प्रवेशिका दि. 20 डिसेंबर 2025 पर्यंत पाठविण्याचे आवाहन जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

**10 हजार खेळाडू सहभागी होण्याची शक्यता - प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष पवार यांची माहिती...**






## विरार-अलिबाग कॉरिडॉरला गती

### बीओटी तत्त्वावर ९६ किमीचा पहिला टप्पा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण (प्रतिनिधी)**

विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉरच्या कामाला आता गती येणार आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाला २२ हजार २५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून हुडकोकडून घ्याव्या लागणाऱ्या या कर्जास अखेर राज्य सरकारने हमी दिली आहे.

विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉरच्या आवश्यक भूसंपादनासाठी २२ हजार २५० कोटींची गरज आहे. पालघर जिल्ह्यातील नवघर ते रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील बलवली असे ९६ किलोमीटरचे पहिल्या टप्प्यातील काम बांधा, वापरा व हस्तांतरित करा (बीओटी) या तत्त्वावर करण्यात येणार आहे. भूसंपादनासाठी आवश्यक निधीची उभारणी करण्यासाठी हुडकोकडून कर्ज घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या कर्जासाठी हुडकोने घातलेल्या अटींना मान्यता देण्यास राज्य सरकारने सुरुवातीस नकार दिला होता. तर दुसरीकडे हुडको अडून बसल्याने कर्ज उभारणी रखडली होती. अखेर हुडकोच्या अटी शर्थीनुसार कर्ज उभारणीस शासन हमी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विरार ते अलिबाग या मार्गावर बांधण्यात येणाऱ्या या कॉरिडॉरमुळे रस्ते, रेल्वे मार्गाचे एकत्रीकरण होणार. हुडकोमार्फत निधी उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे.

यामुळे भूसंपादनाचा प्रश्न सुटेल आणि लवकरच काम सुरू होईल. हा प्रकल्प १२६.०६ किलोमीटर लांबीचा असेल. या प्रकल्पात रस्ते आणि रेल्वे मार्गाचे एकत्रीकरण केले जाईल. यात ८ ते १४ लेनचा प्रवेश-नियंत्रित एक्सप्रेसवे असेल. विरार ते अलिबाग प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. हे पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांना जोडेल. ज्यामुळे जेएनपीटी आणि नवी मुंबई विमानतळ यासारख्या प्रमुख आर्थिक केंद्रांमध्ये प्रवेश सुलभहोईल.

**ह्या कॉरिडॉरमुळे एमएमआर प्रदेशातील लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पालघर जिल्ह्यातील नवघर ते पेण तालुक्यातील बळवली पर्यंतचा ९६.४१ किलोमीटरचा पहिला टप्पा बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर मंजूर करण्यात आला आहे. हा मल्टीमॉडल कॉरिडॉर प्रकल्प ५५ हजार कोटींचा आहे. पहिल्या टप्प्यासाठी सुमारे १८,४३१.१५ कोटी खर्च अपेक्षित आहे. एमएमआर प्रदेशात वाहतूक कनेक्टिव्हिटी सुधारणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.**



## छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणच्या सरचिटणीस पदी डॉ.निलेश रेवगडे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण या संस्थेच्या सरचिटणीस पदी झालेल्या निवडणुकीत डॉ निलेश रेवगडे प्रचंड मतांनी विजयी झाले. कल्याणमधील अभिनव विद्यामंदिर येथे झालेल्या छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. संस्थेच्या अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाली तर सरचिटणीस पदी डॉ निलेश रेवगडे व अनिल पांचाळ यांच्यात निवडणूक झाली या निवडणुकीत डॉ निलेश रेवगडे हे विजयी झाले.

छत्रपती शिक्षण मंडळाच्या ठाणे रायगड व पालघर जिल्ह्यात ५५ शाळा असून त्यात ११ पूर्व प्राथमिक ११ प्राथमिक २७ माध्यमिक पाच कनिष्ठ महाविद्यालय व एक वरिष्ठ महाविद्यालय यांचा समावेश आहे या मंडळात एकूण 20 हजाराहून अधिक विद्यार्थी शिकत असून ६८८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी काम करीत आहेत

२०२५ ते २०२८ या कालावधीत अध्यक्षपदी डॉ नंदकिशोर जोशी कोषाध्यक्ष विश्वास सोनावणे तर सरचिटणीस पदी डॉ निलेश रेवगडे यांची निवड झाली

सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी निमंत्रित सदस्य व मुख्याध्यापक संघटनेचे उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे अभिनव विद्यामंदिरचे मुख्याध्यापक संपत गिते, अरुण आवटे, रमाकांत पाटील व अनिल सानप सर यांनी शुभेच्छा दिल्या.

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सुहित जीवन ट्रस्टचे शानदार यश










**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण (प्रतिनिधी)**

सुहित जीवन ट्रस्ट, पेण, रायगड येथील विद्यार्थी व प्रौढ व्यक्तींनी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित रायगड जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दिव्यांग कल्याण विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबाग आणि ब्युटीफूल टुमारो फाउंडेशन, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या क्रीडा स्पर्धा 06 डिसेंबर रोजी खारघर येथे यशस्वीरित्या पार पडल्या. रायगड जिल्ह्यातील विविध 16 शाळांमधील एकूण 350 विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उल्लेखनीय आणि दैदिप्यमान कामगिरी करत 14 प्रथम, 7 द्वितीय व 7 तृतीय अशी एकूण 28 ट्रॉफीज आणि प्रमाणपत्रे मिळवून जिल्ह्यात संस्थेचा गौरव वाढविला.

100 मीटर धावणे, जागेवर उडी, गोळाफेक, लांब उडी आणि सॉफ्ट बॉल अशा विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवत भरघोस यश संपादन केले. सुहित जीवन ट्रस्टमधील विद्यार्थी व प्रौढ व्यक्तींचा आत्मविश्वास, जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर क्रीडा मैदानीत आपली चमकदार छाप सोडली आहे. स्पर्धेदरम्यान खेळातील समर्पण, संघभावना आणि शिस्त पाहून उपस्थित मान्यवरांनीही कौतुकाचा वर्षाव केला. विविध स्पर्धांमध्ये त्यांनी दाखवलेली कामगिरी ही त्यांच्या क्षमतेची आणि सातत्यपूर्ण सरावाची जणू जीवरस घोषणा होती. या उल्लेखनीय यशामागे, विद्यार्थ्यांचे पालक, संस्था तसेच क्रिडा प्रशिक्षक अमोल काईनकर आणि सौ. प्रिती म्हात्रे यांचे मार्गदर्शन व पाठबळ अतिशय मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या या चमकदार कामगिरीमुळे समाजातील सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून संस्थेचा गौरव उंचावला आहे.

## ४७ रॅपिडो दुचाकीस्वारांवर 'आरटीओ'ची कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - मोटार वाहन अधिनियमाचे उल्लंघन आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाचा आवश्यक पक्का परवाना न घेता कल्याण विभागात प्रवाशांना नियमबाह्य पध्दतीने रॅपिडो बाईक टॅक्सीच्या सेवा देणाऱ्या ४७ दुचाकी स्वारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. आणि अशाप्रकारची ऑनलाईन उपयोजनमधून सेवा देणाऱ्या एका खासगी कंपनीवर महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी दिली. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बारकुल यांनी सांगितले, मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ९३ प्रमाणे रॅपिडो दुचाकी सेवा देणाऱ्या चालक, मालकांनी परिवहन विभागाचा परवाना घेणे बंधनकारक आहे. शासनाच्या धोरणाचे पालन न करता अनेक खासगी रॅपिडो सेवा देणाऱ्या कंपन्या बेकायदा प्रवासी वाहतूक करत आहेत.

## भविष्यवेध



**सोमवार**
**08 डिसेंबर 2025**

**मेष**
योग्य निर्णय घेणे खूप महत्वाचे आहे. आजच्या दिवसाची सुरुवात चांगली होईल. आज तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल जेणेकरुन हवे ते सर्व साध्य करता येईल.

**वृषभ**
संवादाशी संबंधित काही नवीन तंत्रज्ञानाचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुमच्या आजूबाजूच्या लोकांमध्ये तुमची चांगली प्रतिमा तयार होईल. चिंता नाहीशी होईल.

**मिथुन**
तब्येत एकदम ठीक राहील. दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमच्या आई-वडिलांच्या आरोग्याबाबत चिंतेत असाल. आपल्या खर्चात उदार होऊ नका

**कर्क**
इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका, यामुळे जीवनात शांतता येईल. दिवस आत्मविश्वास आणि अपेक्षांचा आहे. कोणत्याही परिस्थितीत निराश होऊ नका.

**सिंह**
मनोरंजक , माहितीपूर्ण साहित्य वाचण्यासाठी वेळ घालवाल, कोणतेही महत्त्वाचे काम वेळेवर पूर्ण होईल. वरिष्ठांची मर्जी सांभाळाल. समधान मिळेल.

**कन्या**
विद्यार्थी अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील, आज एक नवीन भेट आणली आहे. आज तुमच्या मनात अनेक सकारात्मक भावना येतील. देवपूजेत दिवस व्यतित होईल.

**तुळ**
प्रियकरासाठी दिवस अनुकूल आहे. कोणाशीही वादात पडू नका अहंकारावर नियंत्रण ठेवा. जास्त विचार केलात तर काही महत्त्वाची उपलब्धी हातून जाईल.


**वृश्चिक**
दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुमचे विशेष काम तुमच्या इच्छेनुसार होणार आहे, त्यामुळे कोणतीही मेहनत कमी करू नका. फळाची अपेक्षा नको.

**धनु**
एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन वैयक्तिक प्रश्न सोडवा. दिवस चांगला जाणार आहे. जवळच्या नातेवाईकांच्या आगमनामुळे उत्सवाचे वातावरण असेल

**मकर**
सकारात्मक संवाद होतील. प्रत्येक काम नियोजित रीतीने आणि एकाग्रतेने केल्यास यश मिळेल. गुंतवणुकीशी संबंधित महत्त्वाच्या योजनाही यशस्वी होतील.

**कुंभ**
मद्यपानाच्या सवयीवर ताबा मिळविण्यासाठी शुभ दिवस. धन हानी होण्याची शक्यता आहे. देवाण-घेवाणीत सतर्क राहाणे तुमच्यासाठी चांगले.

**मिन**
दिवस अत्यंत महान आहे, कामाकडे लक्ष जाईल, जे लोक पैश्याला विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे धनाची बचत करा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY

Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

# आगरी महोत्सवातून घडणार आगरी समाजाचे वास्तवदर्शी दर्शन

## 12 डिसेंबर पासून डोंबिवलीत एकविसावा आगरी महोत्सव



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आगरी समाज आतुरतेने वाट बघत असलेला आगरी युथ फोरम या सेवाभावी संस्थेचा आगरी महोत्सव डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात दिमाखात रंगणार आहे. गेली २० वर्ष आपली वेगळी छाप उमटवणारा आगरी महोत्सव यंदाही डोंबिवलीतील ह.भ.प. सावळाराम म्हात्रे क्रीडा संकुलनात १२ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत संपन्न होणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुलाब वझे व यंदाच्या आगरी महोत्सवाचे नवनिर्वाचित अध्यक्ष शरद पाटील यांनी दिली.

आगरी समाज मुंबई-कर्जत-कसारा पासून थेट ठाणे रायगड जिल्ह्यात विखुरलेला असल्याने आगरी समाजाची संस्कृती परंपरा टिकविण्याचे कार्य आगरी युथ फोरम ही संस्था गेली दोन दशकांहून अधिक काळा पासून अविरत करीत आहेत. यंदाच्या आगरी महोत्सवाचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघातील माजी कसोटी क्रिकेट पट्टू नीलेश कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्यासह आगरी समाजाचे ज्येष्ठ नेते राम ठाकूर, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, ज्येष्ठ नेते दशरथ पाटील, माजी केंद्रीय मंत्री कपील पाटील, वनमंत्री गणेश नाईक, खासदार सुरेश म्हात्रे, संजय पाटील, श्रीकांत शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत.

आगरी महोत्सवात आगरी संस्कृती आणि परंपराचे दर्शन घडविले जाते. सांस्कृतिक कार्यक्रमांसह आगरी खाद्य पदार्थ्यांची मेजवानी असते. तसेच समाज प्रबोधनपर चर्चा सत्रे आणि व्याख्यानेंचे आयोजन केले जाते. नव कलाकारांना एक सांस्कृति व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाते अशी माहिती महोत्सवाचे आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे यांनी दिली आहे. यंदा महोत्सवाचे अध्यक्षपद शरद पाटील यांना देण्यात आले आहे. हा आगरी महोत्सव म्हणजे आगरी कोळी संस्कृतीचा मिलाप असतो.

या महोत्सवात दि. बा. पाटील एक व्यक्तीमत्व या परिसंवादात दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील सहभागी होणार आहेत. भजन संध्या कार्यकर्म ही पार पडणार आहे. दत्ता पाटील सिद्ध हस्त गीतकार या कार्यक्रमातून दत्ता पाटील यांच्या स्मृतींना उजाळा दिला जाणार आहे. १५ डिसेंबर रोजी प्रगती का'लेजमध्ये आगरी बोलीभाषा साहित्य संमेलन आयोजित केले आहे. त्याचबरोबर बोलीभाषा साहित्य व समाज या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादातडॉ. मिलिंद जोशी यांच्यासह डॉ.श्रीपाद जोशी, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, डॉ. वर्षा तोडमल आदी सहभागी होणार आहेत. एआय या विषयावर डॉ.अच्युत गोडबोले हे मार्गदर्शन करणार आहेत. वयात येताना काय काळजी घ्यावी या विषयावर डॉ. गायत्री पाटील यांचे व्याख्यान होणार आहे .

आगरी महोत्सवातून जमा होणारा निधी हा समाज कार्यासाठी खर्च केला जातो. एक लाखाहून अधिक निधी पुरस्कारावर खर्च केला जातो. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. समाजातील होतकरु गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी दहा हजार रुपये या प्रमाणे पाच लाखाचा निधी खर्च केला जातो.

यासाठी संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव वझे, कार्याध्यक्ष जालिंदर पाटील, उपाध्यक्ष विश्वनाथ रसाळ, खजिनदार पांडुरंग म्हात्रे, शरद पाटील, विजय पाटील, नारायण महाये, कांता पाटील, अनंत पाटील, दीपक पवार, वासुदेव पाटील यांच्यासह सल्लागार आणि त्यांचे सर्व सहकारी महोत्सव सुनियोजन करून महोत्सव यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत.

दररोज राजकिय, सामाजिक, साहित्यिक, कला-क्रिडा क्षेत्रातील अनेक नामवंत मान्यवर याच व्यासपीठावर गप्पागोष्टी साधणार आहेत. याशिवाय विविध गृहोपयोगी वस्तू, इलेक्ट्रानिक वस्तू, आगरी समाज संस्कृतीचे दर्शन घडवणारे स्टाल, वैशिष्टेपूर्ण सुकी मासळी बाजार, खवैय्यांसाठी स्वादिष्ट आगरी पद्धतीच्या व इतर खाद्य पदार्थांचे स्टॉल तसेच सामाजिक संस्थांचेही स्टॉल आहेत. सर्वांसाठी सर्वकाही, मनोरंजनासाठी आकाश पाळण्यासारखी अनेक साधने असणारा आगरी महोत्सव नव्या रंगात, नव्या ढंगात डोंबिवलीत धुमधडाक्यात डिसेंबर मध्ये होत आहे.

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कल्याण ता. कल्याण यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

**प्रति,**
१) श्री. रामदास अनंता भोईर
रा. पळसोळी पो. वेहळे,
ता. कल्याण जि.ठाणे ........................................ अर्जदार

**विरुध्द**

२) ग्रुप ग्रामपंचायत पळसोळी.
जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
कल्याण ता. कल्याण जि.ठाणे ....................सामनेवाला

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे :

१. उपरोक्त अर्जदार यांची मुलगी **ज्योत्स्ना रामदास भोईर** यांचा **जन्म दिनांकः ११/०३/१९९७** रोजी त्यांचे राहते घरी (पळसोळी) वरील पत्त्यावर येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म ची नोंद निबंधक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, कल्याण दफ्तरी करुन जन्म चा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा जन्म ची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि.०७/०८/२०२५ दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे ज्योत्स्ना रामदास भोईर चा जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ४/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/-**
**(स्वाती घोंगडे)**
**प्र. तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण**

**जावक क्रमांक :**
**फौजदारी / जन्म मृत्यु नोंद /टे-०६/कावि-२४७/२०२५**
**दि. ४/१२/२०२५**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कल्याण ता. कल्याण यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

**प्रति,**
१) श्री. रामदास अनंता भोईर
रा. पळसोळी पो. वेहळे,
ता. कल्याण जि.ठाणे ........................................ अर्जदार

**विरुध्द**

२) ग्रुप ग्रामपंचायत पळसोळी.
जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
कल्याण ता. कल्याण जि.ठाणे ....................सामनेवाला

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे :

१. उपरोक्त अर्जदार यांचा **मुलगा अक्षय रामदास भोईर** यांचा **जन्म दिनांकः २७/०९/१९९८** रोजी त्यांचे राहते घरी (पळसोळी) वरील पत्त्यावर येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म ची नोंद निबंधक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, कल्याण दफ्तरी करुन जन्म चा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा जन्म ची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि.०७/०८/२०२५ दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे अक्षय रामदास भोईर यांचा जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ४/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/-**
**(स्वाती घोंगडे)**
**प्र. तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण**

**जावक क्रमांक :**
**फौजदारी / जन्म मृत्यु नोंद /टे-०६/कावि-२४८/२०२५**
**दि. ४/१२/२०२५**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कल्याण ता. कल्याण यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

**प्रति,**
१) श्री. रामदास अनंता भोईर
रा. पळसोळी पो. वेहळे,
ता. कल्याण जि.ठाणे ........................................ अर्जदार

**विरुध्द**

२) ग्रुप ग्रामपंचायत पळसोळी.
जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
कल्याण ता. कल्याण जि.ठाणे ....................सामनेवाला

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे :

१. उपरोक्त अर्जदार यांची मुलगी **आश्विनी रामदास भोईर** यांचा **जन्म दिनांकः २७/०५/१९९५** रोजी त्यांचे राहते घरी (पळसोळी) वरील पत्त्यावर येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म ची नोंद निबंधक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, जन्म दमृत्यू नोंदणी विभाग, कल्याण दफ्तरी करुन जन्म चा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा जन्म ची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि.०७/०८/२०२५ दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे आश्विनी रामदास भोईर चा जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ४/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/-**
**(स्वाती घोंगडे)**
**प्र. तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण**

**जावक क्रमांक :**
**फौजदारी / जन्म मृत्यु नोंद /टे-०६/कावि-२६४/२०२५**
**दि. ४/१२/२०२५**

---

# अमृत योजनेच्या जलवाहिन्यांचा विस्तार करा - भाजपाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अमृत योजनेच्या अंतर्गत पाण्याच्या लाईनचा विस्तार करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आली असून याबाबत भाजपाचे कल्याण ग्रामीण मंडळ -२ चे चिटणीस संदिप क्षीरसागर आणि महिला उपाध्यक्ष सोनी क्षीरसागर यांनी अमृत योजनेचे कार्यकारी अभियंता शैलेश कुलकर्णी यांची भेट घेत निवेदन दिले आहे. मलंगगड रोड विभागातील मांऊटन इमारत लगत आडिवली येथे अमृत योजनेच्या अंतर्गातून पिण्याच्या पाण्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरित काम येत्या दोन तिन महिन्यात पुर्ण होईल अशी आशा आहे. अमृत योजनेच्या अंतर्गातून काही विभागात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकून विस्तार करण्यात यावा अशी मागणी भाजपाच्या वतीने करण्यात आली आहे. यामध्ये आडीवलीतील राजाराम पाटील नगर ते प्रदिप नगर, गणेश चौक ते ३ बंगला मार्ग हेरा अपार्टमेंट पर्यंत, प्रदिप नगर ते अंनता भोईर चौक, अंनत भोईर चौक ते अंजनाबाई गार्डन मार्ग, ऑस्टीन नगर, श्री मंलग गड रोड मुख्य रोड पर्यंत, गणेश चौक ते ३ बंगला ते मंगेश पार्क पर्यंत, सदगुरू अपार्टमेंट प्रदिप नगर ते वैष्णवी अपार्टमेंट या परिसराचा समावेश आहे. तरी यान विभागात लवकरात लवकर पिण्याच्या पाण्याची लाईन टाकून विस्तार करावा अशी मागणी भाजपाच्या संदिप क्षीरसागर आणि सोनी क्षीरसागर यांनी केडीएमसीकडे केली आहे.



# म्हसा विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड (वार्ताहर) :** दि 6.वीर हुतात्मा भाई कोतवाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, म्हसा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव डाँ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या दिवशी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य आनंद जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. " हे विश्वची माझे घर" या उक्तीनुसार साऱ्या विश्वाला समता, स्वातंत्र, बंधूता आणि "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा " चा मुलमंत्र ज्यांनी दिला त्या ज्ञान सूर्याची तथा महामानवाची आठवण करणे हे परम कर्तव्य आहे.त्यांनी दाखवलेल्या मार्गांवरच आपण मार्गक्रमण करत आहोत. त्यांचे अनुसरण हेच आपले महाभाग्य आहे.असे भावोदगार प्रा जाधव यांनी व्यक्त केले. क्रीडा शिक्षक भानुदास लोहार, प्रा सुनिता निपुरते, उदय गुरव,महेंद्र पष्टे यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महेंद्र बेद्रे यांनी केले.

या वेळी श्रद्धा भावार्थे-गुरव, शालिनी चौधरी,सौ करोटे, सुरेखा कराळे,प्रा जगन्नाथ कथोरे, रणजितसिंग कच्छवा आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी रमाबाई पष्टे आणि प्रशांत परते यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा कार्यालाच्या रूममध्ये सीलबंद? भीमशक्तीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला उपोषणाचा इशारा !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शरद भसाळे**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या इमारतीमध्ये शनिवारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणा निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. मात्र याच इमारतीमध्ये पालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रपिता महात्मा गाधी यांचा पुतळा गेल्या काही महिन्यापासून बंदिस्त खोलीत ठेऊन त्यास सीलबंद केल्याने भीमशक्ती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला असून पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी तातडीने हे दोन्ही पुतळे महापालिकेच्या मुख्य इमारतीच्या तळ मजल्यावरील सभागृहात सन्मानाने सजावट करून स्थापित करावेत, अशी मागणी भीमशक्ती संघटनेचे शहरध्यक्ष सुरेश मस्के व एस.मो.अन्सारी यांनी केली आहे. याबाबत पालिका आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांना लेखी निवेदन पत्र दिले आहे.

**अतिरिक्त आयुक्त श्रीमती नयना ससाणे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले कि, "मी पदभार घेऊन काही दिवस झाले आहे. या बाबत बांधकाम विभागाकडून माहिती घेऊन घेईन!" - असे सांगितले**

भिवंडी पालिकेची जुनी प्रशासकीय इमारत मंडई-प्रभुआळी येथे होती. त्या इमारतीच्या दर्शनी भागात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा अर्धाकृती पुतळा बसविलेला होता.या इमारतीतील प्रशासकीय कार्यालय काप-आळी येथे स्थलांतरित केल्यानंतर रिकाम्या झालेल्या टाऊन हॉलमध्ये भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर वाचनालय सुरु करण्यात आले होते.या वाचनालय आतिल प्रवेश

भागात सुशोभीकरण करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळा बसविण्यात आला होता. हे दोन्ही पुतळे भिवंडीकरांचे प्रेरणास्थान असल्याने त्यांच्या जयंती आणि महापरिनिर्वाणदिनी सार्वजनिकरित्या कार्यक्रम करून पालिकेमार्फत देखील त्यांच्या अर्धाकृती पुतळयास सुशोभीकरण करून पुष्पहार अर्पण केला जात होते.वाचनालय इमारत धोकादायक झाल्याने ती मनपाने पाडली आहे. तत्पूर्वी महापालिका प्रशासनाने सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आणि राष्ट्रपिता महात्मा गाधी यांचे दोन्ही अर्धाकृती पुतळे महापालिकेच्या मुख्यालयाच्या इमारतीमधील एका सीलबंद खोलीत गेल्या वर्ष भरापासून ठेवले आहेत.त्यामुळे शहरातील महापुरूषांच्या अनुयायामध्ये नाराजी पसरलेली आहे.

राष्ट्रीय महापुरुषांचे पुतळे सीलबंद खोलीत ठेऊन पालिका प्रशासन त्यांचा अवमान करीत असून या पुतळयांची महापालिकेच्या मिळकतीमध्ये दर्शनी भागात तात्काळ स्थापन करावे, अशी मागणी भीमशक्ती

संघटनेचे शहराध्यक्ष सुरेश मस्के, कार्याध्यक्ष श्रीपत तांबे,सचिव एस. मोहम्मद अन्सारी,प्रभाकर जाधव यांनी लेखी पत्राद्वारे अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे व आयुक्त अनमोल सागर यांच्याकडे केली आहे.या मागणीची दखल प्रशासनाने न घेतल्यास भीमशक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेसमोर उपोषण आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

# टिटवाळ्यात स्वतंत्र वाहतूक विभाग स्थापन करा -अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** वाढत्या लोकसंख्येसोबतच वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत असलेल्या टिटवाळा शहरात स्वतंत्र वाहतूक विभागाची स्थापना करण्याची मागणी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाने केली आहे. पोलिस अधीक्षक ग्रामीण कार्यालयाच्या अंतर्गत टिटवाळ्याच्या वाहतुकीकडे विशेष लक्ष देण्यात यावे, असे निवेदन महासंघाचे शहराध्यक्ष जितेंद्र जोशी यांनी अपर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांना दिले. टिटवाळा फाट्यापासून ते टिटवाळा शहरापर्यंत दररोज प्रचंड



वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. टिटवाळा परिसरात सार्वजनिक वाहतुकीची इतर साधनांची कमतरता असल्याने रिक्षा व खासगी वाहनांवर अतिरिक्त भार येत आहे. त्यातच ट्रॅफिक वॉर्डन वाहनतळ टोइंग व्हॅन यांच्या उपलब्ध करून देण्याबाबत देखील जोशी यांनी चर्चा केली रेल्वे स्टेशन मार्गावरील अनियमित पार्किंगमुळे नागरिक त्रस्त झाल्याची बाब त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिली. ठाणे ग्रामीण पोलीस दलात वाहतूक शाखेची स्पष्ट विभागणी नसल्याने वाहतूक नियमांचे पालन, अपघात नियंत्रण आणि गुन्हे प्रतिबंध यांची जबाबदारी स्थानिक पोलीस ठाण्यावरच पडते. त्यामुळे नियमित कायदा व सुव्यवस्था राखताना वाहतूक नियंत्रणाचा जादा भार उचलावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

आगामी काळात टिटवाळा शहराचा वेगाने होत असलेला विस्तार, टिटवाळा पूर्वेकडील नव्या वसाहती, तसेच मंदिर पर्यटनामुळे वाढणारी गर्दी लक्षात घेता स्वतंत्र वाहतूक विभागाची गरज आहे, असे महासंघाने स्पष्ट केले. नागरिकांच्या सुरक्षेसह वाहतुकीची शिस्त राखण्याकरिता या मागणीवर सकारात्मक विचार करून तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा जितेंद्र जोशी यांनी व्यक्त केली आहे.




ठाणे ■ सोमवार
08 डिसेंबर 2025
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# “बाबासाहेब आमच्या रक्तात-श्वासात ” जालना मस्तगड मध्ये युवकांची प्रतिज्ञा

**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**
**जालना:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मंगळवारी मस्तगड (ता. जालना) येथे युवकांनी एकत्र येऊन बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या संकल्पपूर्ण कार्यक्रमास उद्योजक दीपक डोंगरे, शेतकरी विजय ओमप्रकाश भगत, नाना करंडे, भरतानंद भक्त (पहिलवान), बालाजी शहाणे , शेख सिद्धीक यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक युवक व नागरिक उपस्थित होते. यावेळी राहुल करनाडे म्हणाले, “बाबासाहेब गेले तरी आमच्यातून गेले नाहीत. त्यांचा प्रकाश आमच्या रक्तात आहे, त्यांचा लढा आमच्या श्वासात आहे. आम्ही फक्त स्मरण करत नाही, आम्ही त्यांच्यासारखे जगतो आहोत आणि जगणार आहोत.” पुतळ्यापुढे हात जोडून त्यांनी प्रतिज्ञा घेतली, “बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण होईपर्यंत आमचा संघर्ष थांबणार नाही.” उपस्थितांनी बाबासाहेबांनी दिलेल्या “शिका, संघटित व्हा, संघर्ष करा” या मूलमंत्राची आठवण करून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. “बाबासाहेब केवळ स्मरण करायचे नाहीत, तर त्यांच्यासारखे जगायचे आहे,” अशी एकमुखी भावना यावेळी व्यक्त झाली.




## महापरिनिर्वाण दिनानिमित्त सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयात रा. से. यो. विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित सौ कमलताई किसन कथोरे महाविद्यालय म्हसा येथे दि. ०६ डिसेंबर २०२५ रोजी च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रा. कन्या हरड व प्रा.दिपक शेळके व विधी महाविद्यालयाचे प्रा. गणेश चहाड सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश माळी, NSS प्रमुख कन्या हरड व प्रा.दिपक शेळके महाविद्यालयाचे प्राध्यापक आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कन्या हरड व आभारप्रदर्शन प्रा. दिपक शेळके यांनी केले शेवटी भारताचे संविधानाचे वाचन करून कार्यक्रम संपन्न झाला.



## वर्तकनगर माध्यमिक विद्यालयात गीताजयंती उत्सव साजरा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे : प्रतिनिधी**

धार्मिक मान्यतेनुसार संपूर्ण जीवनाचे प्रेरणास्थान असलेल्या भगवद्गीतेची जयंती, मोक्षदा एकादशी या शुभदिनी ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या वर्तकनगर माध्यमिक विद्यालयात ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा नमिता सोमण, चिटणीस ॲड.केदार जोशी यांचे मार्गदर्शनाखाली गीताजयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कै. द. ल. मराठे प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री मोहिते तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिका प्रा. मेधाताई दामोदर सोमण उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश आव्हाड यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. त्यानंतर श्रीकृष्ण नृत्य, भगवद्गीतेची आरती आणि ईशस्तवन सादर करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी गीतेतील पंधरावा अध्याय शुद्ध व स्पष्ट उच्चारात सादर केला. यावेळी प्रा.मेधाताई सोमण व अध्यक्षा श्रीमती मोहिते यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विविध लघुकथांच्या माध्यमातून गीतेचे सार प्रभावीपणे उलगडून दाखविले. कार्यक्रमाच्या आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना गीतेचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. विद्यालयात गीतापठण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. गीताजयंतीनिमित्त स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमातील गीत व नृत्याची तयारी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका मानसी सूर्यवंशी आणि सहशिक्षिका मृणाल पाटील यांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक महाले आणि आभार प्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक विजय लोहार यांनी केले. विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत उत्तम प्रकारे यशस्वीपणे संपन्न झाला.



## पडघा - पाच्छापुर रस्त्यावर गवताचे अतिक्रमण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पडघा दि. ६ (प्रतिनिधी)** : भिवंडी तालुक्यातील दळण वळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा समजला जाणाऱ्या पडघा-पाच्छापुर रस्त्यावर गवताचे अतिक्रमण झाले असुन त्यामुळे सदर रस्ता हा अरुंद भासत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या पडघा-पाच्छापुर रस्त्याचे नुकतेच सिमेंट कॉक्रींटीकरण करण्यात आले असुन पावसांमुळे रस्त्याच्या कडेला उगवलेल्या गवताचे या रस्त्यावर दोन्ही बाजूला एक ते दोन फुटांपर्यंत अतिक्रमण झाले असुन रस्त्याच्या कडेच्या दोन फुटांपर्यंत या रस्त्याचा गवतामुळे वापर होत नसल्याने हा रस्ता अरुंद भासत आहे.

त्यामुळे या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या दोन गाड्या पास होण्यास वाहनचालकांना अडचणी निर्माण होत असल्याचे वाहनचालकाचे म्हणणे आहे. पडघा पाच्छापुर रस्त्यालगत असलेल्या अनेक खेडी पाडी, गांवासहीत वांसीद, दाभाड, अंबाडी, कुडूस, वाडा, वज्रेश्वरी, गणेशपुरी, वसई, विरार व पडघा येथील मुंबई नाशीक महामार्गावर जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर होत असल्याने स्थानीक रहीवासी, कामगार, विद्यार्थी, प्रवाशी वाहने यांची या रस्त्यावर दिवस, रात्र वर्दळ असल्याने हा रस्ता महत्वाचा मानला जातो. त्यामुळे या रस्त्यावर कडेला अतिक्रमण झालेले गवत काढुन टाकण्याची मागणी परिसरातील वाहनचालक नागरीकांकडुन होत आहे.

# लालसेपोटी शिकलेली माणसेच जास्त फसतात

## - सहा. पोलीस निरिक्षक ज्ञानबा निकम यांचे प्रतिपादन

### स्काऊट–गाईडचे एकदिवसीय निवासी शिबीर उत्साहात संपन्न

### विद्यार्थ्यांनी शिस्त, साहस आणि डिजिटल सुरक्षिततेचे घेतले धडे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे : प्रतिनिधी**

सायबर गुन्ह्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असताना आहेत. APK फाईल कधीही डाउनलोड करू नका. गेमचे ॲप्स डाऊनलोड करणेही धोकादायक ठरू शकते. AI च्या माध्यमातून फोटो बदलून ब्लॅकमेलिंगचे प्रमाण वाढत आहे. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी संवाद टाळा. ऑनलाइन खरेदीतील बनावट लिंक, खाते अपडेट, KYC, बक्षीस योजना यांमधून आर्थिक फसवणूक केली जाते. आज सायबर गुन्ह्यात सर्वाधिक फसत आहेत ते शिकलेली माणसे. लालसेपोटी ‘लवकर नफा’, ‘मोफत गिफ्ट’, ‘बक्षीस जिंकले’ अशी संदेश पाहून लोक खातरजमा न करता पैसे पाठवतात. लालसेमुळेच बहुतेक जण फसतात. सायबर गुन्हा झाल्यास त्वरित 1930 वर फोन करून तक्रार नोंदवावी, तक्रार केल्यावरच पोलिसांना मदत करता येते. सायबर पोलिसांकडून तपास, खाते ब्लॉक करणे आणि गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी तातडीने कार्यवाही केली जाते. नागरिकांनी सावध राहावे आणि वेळेवर तक्रार करावी असे श्रीनगर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानबा नामदेव निकम यांनी स्काऊट गाईड शिबीरात सायबर सुरक्षितता



या विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले. ठाणे भारत स्काऊट गाईड जिल्हा संघटक हेमांगी पाटील व मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांचे मार्गदर्शनाखाली श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालय, इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे येथे दिनांक 6 डिसेंबर 2025 रोजी एक दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिस्त, नेतृत्व, समाजसेवा आणि सायबर सुरक्षितता यासारख्या मूलभूत जीवन मूल्यांच्या प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी दिवसभरातील उपक्रमातून घेतला. डॉ. उमेश प्रजापती यांनी प्रथोमोपचार या विषयावर मार्गदर्शन करत अचानक दुखापत, भाजणे, रक्तस्राव, बेहोशी, मळमळ होणे इत्यादी प्रसंगी करावयाच्या प्रथमोपचार तंत्र सांगितले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी नेमकी उत्तरे देऊन वातावरण उत्साही केले. स्काऊट गाईडचे ट्रेनर संभाजी सावंत यांचे मार्गदर्शनाखाली शिबिराची सुरुवात झेंडा वंदन, स्काऊट–गाईड प्रार्थना आणि प्रतिज्ञेने झाली. गाठ बांधणी, हालचाल तंत्र, स्काऊट सिग्नल, प्राथमिक सर्व्हायव्हल कौशल्ये आणि टीमवर्कवर प्रभावी प्रशिक्षण दिले. खेळ व शारीरिक तंदुरुस्तीच्या उपक्रमात समूहशिस्त कृती, स्काऊट–गाईड गीत,प्रश्नोत्तर सत्रात मनापासून सहभाग घेत शिबिर वातावरण अधिकच उत्साही केले. शिबीराचे सुत्रसंचालन व आभार सहायक शिक्षक अर्जुन चेमटे यांनी केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी सहाय्यक शिक्षक विनोद राठोड, धनंजय देसले, प्रियंका सिंह, शिक्षकेत्त कर्मचारी संजय मार्कंडे यांनी विशेष मेहनत घेतली. शिबीरास श्रीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस आघवने सर, समाजसेवक महेंद्र सोडारी, उद्योगपती अमित सिंह, श्री क्लासेसच्या वतीने रोहीत सर यांनी भेट दिली.

# खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये एसएसटीची चमक

### त्रिशा नायरची धाव — 4×100 मी. रिले स्पर्धेत रौप्य पदक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण** : राजस्थान येथे पार पडलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये एसएसटी कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सची विद्यार्थिनी त्रिशा नायर हिने उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत ४×१०० मीटर रिले स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. या कामगिरीमुळे एसएसटीचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकले असून महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे. स्पर्धेत देशभरातील नामांकित विद्यापीठांतील धावपटूंमध्ये त्रिशाने तगड्या स्पर्धेला सामोरे जात आपल्या संघाला निर्णायक टप्प्यावर




महत्त्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. तिच्या वेग, कौशल्य आणि सातत्यपूर्ण सरावाचे हे सर्वोत्तम फलित असल्याचे क्रीडा विभागाने सांगितले.

एसएसटी महाविद्यालयाचे प्राचार्य, क्रीडा संचालक, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी त्रिशाचे मनःपूर्वक अभिनंदन करत तिच्या यशाचा गौरव केला. भविष्यातही ती अशाच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. त्रिशाच्या या यशामुळे एसएसटी महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



# टिटवाळा पोलिसांची कामगिरी

### 18 गहाळ मोबाईल तक्रारदारांच्या ताब्यात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण** : वाढत्या मोबाईल चोरीच्या घटनांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना टिटवाळा येथील कल्याण तालुका पोलीस ठाण्याने मोठा दिलासा दिला आहे. ठाण्यात दाखल असलेल्या विविध तक्रारीमधील तब्बल १८ गहाळ मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आलं असून हे सर्व मोबाईल शनिवारी तक्रारदारांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.

कल्याण तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस कर्मचारी गजानन देसले आणि अनिल शेंडगे यांनी ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डी.एस. स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी मुरबाड विभाग अनिल लाड आणि टिटवाळा येथील कल्याण तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही कारवाई केली.

CEIR पोर्टलच्या माध्यमातून करण्यात आलेल्या तांत्रिक विश्लेषणानंतर गहाळ मोबाईलचे लोकेशन शोधण्यात आले. त्यानंतर सखोल तपास, चौकशी आणि पडताळणी करून हे मोबाईल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. तक्रारदारांनी आपल्या अमूल्य वस्तू परत मिळताच पोलिसांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. पोलिसांच्या या कामगिरीमुळे नागरिकांच्या मनात कायदा व सुरक्षेविषयी विश्वास अधिक दृढ झाला आहे. तांत्रिक प्रगतीचा योग्य वापर करून गुन्हेगारी रोखण्याच्या आणि नुकसान भरून काढण्याच्या कामात पोलिसांची ही धडाडी पुन्हा अधोरेखित झाली आहे.

टिटवाळा परिसरात या कारवाईचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत असून, पुढील काळात अशाच तातडीने व परिणामकारक पद्धतीने काम करणाऱ्या पोलीस दलाचे मनोबल या यशामुळे अधिकच दृढ होणार आहे.

# भिवंडी : फसवणुकीच्या आरोपाखाली वैद्यकीय कंपनीच्या दोन सेल्समनना अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (प्रतिनिधी)** वैद्यकीय औषधांचे शहरात वितरण करणाऱ्या कंपनीची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली दोन सेल्समन विरुद्ध भिवंडीतील शांतीनगर पुलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील नायगावमध्ये फार्मा टिप्स हेल्थ केअर नावाची वैद्यकीय वितरक कंपनी चालवणारे तक्रारदार नौमान हफिजुल्लाह अन्सारी यांनी त्यांच्या कंपनीत काम करणाऱ्या मोनिस खलीकुज्जमा अन्सारी आणि मोमिन मुस्लिम निसार अहमद यांच्या विरोधात तक्रार पोलिस ठाण्यात दाखल केली. आहे. त्या तक्रारीनुसार, दोन्ही आरोपींनी १ मे २०२१ ते २१ जुलै २०२५ दरम्यान भिवंडी शहरातील विविध मेडिकल स्टोअर्सना औषधे पुरवून त्यांचे बिलानुसार पैसे गोळा करून जमा करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती. दरम्यान चार वर्षांच्या कालावधीत, त्यांनी बिल वसुलीच्या नावाखाली कंपनीच्या १०,६७,१५७ रुपयांचा अपहार करीत रक्कम कंपनीकडे जमा केली नाही केली.त्यामुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले. त्यामुळे नौमान हफिजुल्लाह अन्सारी यांनी शांतीनगर पोलिस ठाण्यात धाव घेऊन दोघांविरुद्ध तक्रार दाखल केली त्यामुळे पोलिसांनी मोनिस खलीकुज्जमा अन्सारी आणि मोमिन मुस्लिम निसार अहमद यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून दोन्ही सेल्समनना अटक केली आहे. पुढील तपास शांतीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेश चोपडा करीत आहेत.

# वाड्यात जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन

### निमित्त क्रांतिज्योत आदर्श शिक्षक व क्रांतिज्योत जीवन गौरव पुरस्कारांचे वितरण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**वाडा :** क्रांतिज्योत बहुउद्देशीय सामाजिक संघटना व आय. टी. जिनियस कॉम्प्युटर एज्युकेशन मार्फत सलग तिसऱ्या वर्षी वाड्यात जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने मानसिक व बौद्धिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशातून या परीक्षेचे आयोजन करण्यात आल्याचे संस्था चालक कल्पेश ठाणगे यांनी सांगितले. विद्यार्थी - पालक - शाळांमधून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून जिल्हाभरातून अनेक शाळांनी स्पर्धेत सहभाग नोंदवत दोन केंद्रावर तीन गटांतून सुमारे 900 विद्यार्थी परीक्षेला बसले होते. या परीक्षेचा निकाल लगेचच जाहीर करण्यात आला. प्रत्येक गटातील पाच - पाच विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रकमेसह सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले, तर तिन्ही गटातील 6 ते 10 क्रमांकाच्या 15 विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम दरम्यान नवनाथ अनंथा शिंदे (जिल्हा परिषद शाळा, खिंडीचा पाडा), गोपीनाथ सुपा अहिरे (बा. ल. शिंगडा विद्यालय, पोशेरी), किशोर विठ्ठल काठोले (जिल्हा परिषद शाळा, ऐनशेत), अंबादास जगन्नाथ जमादार (आंबिस्ते हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, आंबिस्ते) ह्या चार शिक्षकांना ”क्रांतिज्योत आदर्श शिक्षक पुरस्कार 2025” तर कृष्णा रोडू जाधव ( सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी, पालघर) आणि विकास भाऊसाहेब कांबळे (आश्रमशाळा, आमगाव) यांना ”क्रांतिज्योत जीवनगौरव पुरस्कार 2025” देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी परिसरातील सामाजिक राजकीय पदाधिकारी, जिल्ह्यातील शाळांचे मुख्याध्यापक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी आयोजन समिती व परीक्षक म्हणून तालुक्यातील शाळांच्या शिक्षकांनी काम पाहिले असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केतन मढवी आणि मनोज बुंधे ह्यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आय. टी. जिनियसच्या कर्मचारी, विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024